| MHAH070010092022 | दाखल तारीख | : | ३१/१०/२०२२ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | ३१/१०/२०२२ |
| | निकाल तारीख | : | ०१/११/२०२३ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>०१ ०० ०१ |

**भाग 'अ'**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर, तालुका - संगमनेर, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात :**
**पिठासीन अधिकारी - यो. ही. आमेटा यांचे समोर**

**विशेष सत्र खटला क्र. ५२/२०२२** **नि. क्र. ४५.**

**प्रथम खबर अहवाल क्रमांक : १६०/२०२२.**

**गुन्हा : भारतीय दंड विधान कलम ३७६, ३६३ व बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ चे कलम ४ व ६ अन्वये**

**पोलीस ठाणे : आश्वी पोलीस ठाणे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.**

| | |
|---|---|
| तक्रारदार | महाराष्ट्र राज्य |
| यांच्या वतीने | विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>**श्री. एस. ए. वाकचौरे.** |
| आरोपी | **आकाश ज्ञानदेव मोरे,**<br>वय - २१ वर्ष,<br>रा.पिंप्रीअवघड, ता. राहुरी, जि.अहमदनगर |
| यांच्या वतीने | विद्वान विधिज्ञ **श्री. एस. बी. शिंदे.** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २१/०८/२०२२ ते ३१/०८/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २५/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ३१/१०/२०२२ |
| दोषारोपपत्र सत्र न्यायालयात वर्ग केल्याची तारीख | --- |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १६/१०/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१/१०/२०३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय सुनावल्याची तारीख | ०१/११/२०२३ |
| शिक्षा सुनावल्याची तारीख, जर सुनावलीस | नाही. |

**<u>आरोपीचा तपशिल</u>**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याची तारीख | जमिना वर सोडल्याची तारीख | निश्चित केलेले दोष | दोषमुक्त की दोषसिध्द | सुनाव लेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ अन्वये शिक्षा माफीस पात्र असल्यास, संपरीक्षे-दरम्यान व्यतीत केलेला तुरुंगवास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आकाश ज्ञानदेव मोरे | ३१/०८/ २०२२ | १८/१०/ २०२२ | भा.द.वि. कलम ३७६, ३६३ व बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ चे कलम ४ व ६ अन्वये. | दोषमुक्त | -- | १ महिना व १७ दिवस |

**<u>न्यायनिर्णय</u>**
**<u>( घोषीत दिनांक ०१/११/२०२३)</u>**

१. सदरचे अभियोजन, नमुद आरोपी विरुध्द, वर नमूद करण्यात आलेल्या गुन्हयांतर्गत चालविण्यात येत आहे.

**<u>अभियोगपक्षाने आरोपीं विरुध्द खालील प्रमाणे नमूद तत्वानुषांगाने सदरचा खटला चालविला आहे</u>** :

२. नव-याशी भांडण झाल्यामुळे सदर प्रकरणातील फिर्यादी तिच्या मुली सोबत भावाकडे राहण्यास गेल्याचे सुमारे १० ते १५ दिवसां नंतर ती तिचे मोठया भावा सोबत वडीलांना भेटण्यासाठी कोल्हार येथे गेली व तेथे मुक्कामी थांबली होती. दुस-या दिवशी फिर्यादीला तिच्या लहान भावाने फोन करुन सांगितले की, पिडीता मुलगी घरी नाही. फिर्यादी भावाच्या घरी परतल्यावर गावात व इतर नातेवाईकांकडे शोध घेतला असता ही पिडीता मिळुन आली नाही.

३. त्याच दरम्यान फिर्यादीच्या आईच्या मोबाईल फोनवर पिडीतेने फोन करुन

फिर्यादीस कळविले की, ती आरोपी आकाश मोरे सोबत गेलेली असुन दुस-या दिवशी परत येणार आहे. दुस-या दिवशी पिडीता परत आली नाही म्हणुन फिर्यादीने आश्वी पोलिस स्टेशन येथे दिनांक २५/०८/२०२२ रोजी, आरोपी आकाश मोरे याने पिडीतेस फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन नेल्याचे आरोप करुन भा. दं. वि. कलम ३६३ प्रमाणे तक्रार दाखल केली.

४. फिर्यादीच्या तक्रारअर्जा वरुन गु. र. नं. १६०/२०२२ नोंदविण्यात आला असुन पो.हे.कॉ. राजेंद्र पारधी यांनी प्राथमिक तपासामध्ये घटनास्थळ पंचनामा केला, फिर्यादीचा व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपी व पिडीता मिळुन आल्या नंतर पिडीतेचा जबाब नोंदविला. पुढील तपासामध्ये पो.नि. सुभाष भोये यांनी आरोपीस अटक केली. फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला, पिडीता व आरोपी यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवुन त्यांचे अहवाल तपासाचे कागदपत्रामध्ये सामिल केले, आरोपी व पिडीतेचे कपडे जप्त करुन रासायनिक चाचणीसाठी प्रयोगशाळा नाशिक येथे पाठविले. तपासाअंती आरोपी विरुध्द भा.दं. वि. कलम ३६३ व ३७६ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण कायदा कलम ४ व ६ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

५. नि. क्र. १३ वर दोषारोप निश्चित करुन ते, आरोपीस मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितले असता, आरोपीने दोषारोप नाकारले व गुन्हयाशी काहीएक संबंध नाही व खोटया गुन्हयात गुंतविलेचा बचाव घेउन, अभियोजना समोर जाण्याची तयारी दर्शविली.

६. आरोप सिध्द करण्या करीता अभियोजन पक्षाने खालील नमुद प्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविली व काही कागदपत्रं पुराव्यात सिध्द केले.

**भाग-'क'**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१/ नि.२८ | फिर्यादी | पिडीतेची आई. |
| सा.क्र.२/नि.३० | पिडिता | - |
| सा.क्र.३/नि.३५ | राजेंद्र दादाभाउ पारधी | ठाणे अंमलदार / प्राथमिक तपासी अधिकारी |
| सा.क्र.४/नि.३७ | सुभाष दादा भोये | पुढील तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार :**

| अनुक्रमांक | नांवे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणीकृत दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे दस्ताऐवज :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १८ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १९ | पिडीतेचा मोबाईल जप्ती पंचनमा |
| ३. | २० | पिडीतेचे कपडे जप्ती पंचनामा |
| ४. | २१ | मोटारसायकल क्र. एम.-१२-एस.एन.-९६५२ |
| ५. | २२ | आरोपीचे कपडे जप्ती पंचनामा |
| ६. | २३ | घटनास्थळ पंचनामा ---- पिडीतेला मोटार सायकलवर जेथुन नेले त्या ठिकाणचा |
| ७. | २४ | घटनास्थळ पंचनामा -- अहमदनगर येथे पिडीता व आरोपी ज्या ठिकाणी राहिले त्या खोलीचा |
| ८. | २५ | घटनास्थळ पंचनामा -- मांडवा, ता. आष्टी, जि. बीड येथील कैलास माळी याचे घराचा. |
| ९ | २६ | आरोपीचा अटक पंचनामा. |
| १० | २९ | फिर्याद |
| ११ | ३१ | पिडीतेचा जन्म दाखला |
| १२ | ३२ | प्रोफॉर्मा बाल लैंगिक अत्याचार गुन्हे तपासचा |
| १३ | ३३ | प्रोफॉर्मा बाल लैंगिक अत्याचार गुन्हे तपासचा |
| १४ | ३४ | पंचायत समिती कार्यालय, राहुरी येथील जन्म प्रमाणपत्र |
| १५ | ३६ | पिडीतेचा पोलिस समोरील जबाब |

| | | |
|---|---|---|
| १६ | ३८ | फिर्यादीचा पोलिस समोरील जबाब |
| १७ | ३९, ४०, ४१ | आश्वी पोलिस स्टेशनचे प्रथम न्यायदंडाधिकारी, संगमनेर यांना पत्र |

वर नमूद अ.क्र. १ ते ९ व ११ वरील कागदपत्रे, बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आली असल्याने, सदर कागदपत्रांना निशाणी देण्यात आली.

**ब. बचाव पक्षातर्फे दस्ताऐवज :**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्रांचे वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन दस्ताऐवज :**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्रांचे वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. महत्वाचे वस्तू (डंजमतपंस व्इरमबजे) :**

| **अनुक्रमांक** | **वस्तू क्रमांक** | **वस्तूंचे वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | |

७. अभियोग पक्षाचा पुरावा पूर्ण झाल्यावर, त्यामधील आरोपी विरुध्द आलेल्या तथ्यांचा खुलासा देण्याची संधी, आरोपीला, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये देण्यात येवून, आरोपीचा सदरचा जबाब **नि. क्र. ४३** वर नोंदविण्यात आला. आरोपीने त्याच्या बचावात सदर तथ्यांची सत्यता नाकारुन सदर गुन्हयात त्याला खोटेपणाने गुंतविण्यात आल्याचा बचाव घेतला.

८. विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकून, सदर प्रकरणात अभिलेखावर आलेल्या पुराव्यानुसार, उत्पन्न झालेले मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, घटनेच्या दिवशी म्हणजेच दिनांक २१/०८/२०२२ रोजी पिडिता ही बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १८ वर्षांपेक्षा कमी वयाची असून अल्पवयीन आहे ? | **...होय.** |

| | | |
|---|---|---|
| **२.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. २१/०८/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजताच्या सुमारास गाव दाढ खुर्द, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथून आरोपीने अल्पवयीन पिडीतेला तिच्या कायदेशीर रखवालदारांच्या ताब्यातून त्यांच्या समंती शिवाय पळवून नेले आणि त्याद्वारे, आरोपीने, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३६३ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही.** |
| **३.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक २१/०८/२०२२ ते ३१/०८/२०२२ दरम्यानचे कालावधीत आरोपीने अहमदनगर येथे भाडयाच्या खोलीमध्ये तसेच गांव मांडवा, ता. आष्टी, जि. बीड येथे आरोपीच्या मामाच्या घरी अल्पवयीन पिडीतेशी वारंवार शरीर संबंध केले आणि त्याद्वारे, आरोपीने, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७६(२)(एन) अन्वये गुन्हा केला? | **...नाही.** |
| **४.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीतेशी शारीरीक संभोग केला व त्याव्दारे आरोपीने बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण कायदा कलम ४ अन्वये गुन्ह केला? | **...नाही.** |
| **५.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीतेशी जबरी शारीरीक संभोग केला आणि त्याद्वारे, आरोपीने, बालकांचे लैंगिक अत्याचार पासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ६ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही.** |
| **६.** | काय आदेश ? | **... आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**: <u>का रण मि मां सा</u> :**

९. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, सदर घटनेमध्ये आरोपीने अल्पवयीन मुलीला तिच्या कायदेशीर रखवालदारांच्या ताब्यातून नेल्याचा आरोप आहे. आरोपीने तिडीतेला तिच्या गावाहून मोटारसायकलवरुन अहमदनगर तसेच जिल्हा बीड येथील आष्टी तालुक्यातील मांडवा गांव येथे नेले व नवरा बायको सारखे राहिले असुन आरोपीने पिडीतेशी, ती अल्पवयीन असल्याचे माहिती असुनही तिच्याशी शारीरीक संबंध केले आहेत.

१०. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तिवाद केला की, जरी फिर्यादी व पिडीता त्यांची फिर्याद, जबाब किंवा पुरवणी जबाबाशी साक्ष देत असतील तरी वैद्यकीय अहवाल तसेच दोनही

तपासी अंमलदार यांच्या साक्षीमधुन आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द होते. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे युक्तिवाद केला की, यामुळे आरोपीने गुन्हा केल्याचे गृहित धरुन त्याला शिक्षा होणे गरजेचे आहे.

११. याउलट, बचावपक्षाच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी व पिडीता यांची साक्ष पाहता अभियोजन पक्षास सहाय्य होईल अशी कुठलाही पुरावा त्यांच्या साक्षमधुन आलेला नाही. बचाव वकीलांनी युक्तिवाद केला की, आरोपी विरुध्द असलेले अभियोजन सारखे प्रकरणांमध्ये पिडीतेची साक्ष ही महत्वाची असुन आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द होण्यासारखे असे काहीएक पिडीतेने तिच्या साक्षमध्ये सांगितले नाही.

१२. बचाव वकीलांनी युक्तिवाद केला की, आरोपीने पिडीतेला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन नेल्याचे किंवा पिडीतेशी शारीरीक संबंध केल्याचे सिध्द होत नसुन आरोपी आकाश मोरे विरुध्दचे दोषारोपातील कुठलेही तथ्य सिध्द होत नाही. याप्रमाणे, आरोपी आकाश मोरे यास निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> :**

१३. सदर प्रकरणात आरोपी विरुध्द अभियोजन हे भारतीय दंड विधानाचे कलमा व्यतिरिक्त बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ कायदयाचे असल्याने, पिडीता घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. २१/०८/२०२२ रोजी १८ वर्षापेक्षा कमी वयाची असून ती अल्पवयीन आहे किंवा कसे हे सर्वप्रथम निश्चित करणे गरजेचे आहे.

१४. या अनुषंगाने सा. क्र. १ फिर्यादी तसेच सा. क्र. २ पिडीता यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पिडीतेची जन्म तारीख २३/१२/२००६ अशी असल्याचे सांगितले आहे. या संदर्भात उलट तपासामध्ये बचाव पक्षाने या तथ्यां विरुध्द कुठलेही विसंगत तथ्येही मांडले नाही किंवा तसा कुठलाही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अशा परीरीस्थीतीमध्ये पिडीतेची जन्म तारीख २३/१२/२००६ असल्याचे गृहित धरावे लागणार आहे. या प्रमाणे पिडीता घरातुन गेल्याचा दिनांक २१/०८/२०२२ सुमारास ती १६ वर्षे १० महिने वयाची असून, बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ प्रमाणे पिडीता ही घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. २२/०८/२०२२ रोजी अल्पवयीन असल्याचे सिध्द होते. **त्यामुळे मुद्दा क्र. १ होकारार्थी नोंदविण्यात येतो**.

**<u>इतर सर्व मुददयांकरीता</u> :**

१५. इतर सर्व मुददे एकमेकांशी निगडीत असल्याने, ते एकत्रीत रित्या विचारात घेण्यात आले आहेत.

१६. प्रस्तूत अभियोजनामधील आरोपी आकाश मोरे विरुध्द असलेले आरोप असे आहे की, त्याने अल्पवयीन पिडीतेस, तिच्या मामाच्या गांवाहुन अहमदनगर व तेथून बीड जिल्हयातील आष्टी तालुक्याचे मांडवा गांवात नेले. आरोपी आकाश मोरेवर असेही आरोप आहे की, त्याने अल्पवयीन पिडीतेशी शारीरीक संबंध देखील केले आहेत. यास्तव अभियोजन पक्षाने हे तथ्य प्रस्तूत अभियोजनामध्ये शंकेच्या पलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

१७. सा. क्र. १ फिर्यादीने तिच्या साक्षीत सांगितले की, पिडीतेने तिची आजी म्हणजेच फिर्यादीच्या आईच्या मोबाईल फोन करुन फिर्यादी सोबत बोलली होती व त्यावेळी तिने कळविले की ती आरोपी आकाश मोरे सोबत गेली असुन दुस-या दिवशी परत येणार आहे. सा.क्र. २ पिडीतेने तिच्या साक्षमध्ये सांगितले की, दिनांक २१/०८/२०२२ रोजी तिनेच आरोपीला फोन करुन दाढ खुर्द येथे बोलविले, मग तेथुन दोघे मोटारसायकलवर निघुन गेले. पिडीतेने तिच्या साक्षमध्ये पुढे सांगितले की, ते दोघे अहमदनगर येथे चार दिवस, मग बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यातील मांडवा गांवात आरोपीच्या मामाच्या घरी देखील राहिले. आरोपी आकाश मोरे याने पिडीतेला फोन करुन दाढ खुर्द येथे बोलविल्याचे, तसेच आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवुन प्रोत्साहित करुन पळविल्याचे, सरकारी अभियोक्ता यांनी पिडीतेच्या घेतलेल्या उलट तपासामध्ये तिने स्पष्ट नाकारले आहे.

१८. सा. क्र. १ फिर्यादी तसेच सा. क्र. २ पिडीता या दोन्ही साक्षीदारांची साक्ष पाहिली असता असे आढळुन येते की, आरोपी आकाश मोरे याने पिडीतेला दिनांक २१/०८/२०२२ रोजी लग्नाचे आमिष दाखवुन किंवा इतर कुठलेही प्रोत्साहन देउन तिला पळवुन नेल्याचे सिध्द होत नाही. तसेच जर २१/०८/२०२२ रोजी आरोपीने पिडीतेला पळवुन नेले असते तर अहमदनगर येथे जाई पर्यंत, तिथे तीन चार दिवस राहिले तो पर्यंत तसेच मांडवा गांवात देखील ३१/०८/२०२२ पर्यंत राहिले त्या दरम्यान कधीही पिडीता ही स्वत:ची सुटका करुन घेण्याकरीता कोणालाही संपर्क करु शकली असती किंवा आरडा ओरड करुन देखील इतर लोकांना गोळा करुन सुटका करुन घेण्याचा तिने प्रयत्न केला असता. तरी तसा कुठलाही प्रयत्न पिडीतेने केल्याचे तिने साक्षीमध्ये सांगितले नाही. यामुळे पिडीता स्वत:च्या मर्जीने आरोपी सोबत गेल्याचे प्रथमदर्शनी आढळुन येते. यास्तव आरोपी आकाश मोरे याने पिडीतेला लग्नाचे आमिष दाखवुन किंवा इतर कुठलेही प्रोत्साहन देउन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेल्याचे सिध्द होत नाही.

१९. तसेच आरोपी आकाश मोरे याने अहमदनगर किंवा बीड येथील मांडवा गांवात असतांना पिडीतेशी शारीरीक संबंध केल्याचे, सरकारी अभियोक्ता यांनी पिडीतेच्या घेतलेल्या उलट तपासामध्ये तिने स्पष्टपणे नाकारले आहे. यामुळे पिडीतेने असा कुठलाही जबाब पोलिसांना दिला असला तरीही सदर जबाबाला काहीही महत्व उरत नाही. तसेच पिडीतेची या सदर साक्षमुळे, आरोपीने तिच्याशी शारीरीसंबंध केल्याचे देखील सिध्द होत नाही.

२०. सा. क्र. १ फिर्यादी व सा. क्र. २ पिडीता यांची साक्ष पाहता या दोघांनी अभियोजन पक्षास सहकार्य होईल असे आरोपी आकाश मोरे विरुध्द काहीएक भाष्य केलेले नाही व या दोघांनी फिर्याद व त्यांच्या अगोदरच्या जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिली. तसेच या दोनही साक्षीदारांची सरकारी अभियोक्ता यांनी घेतलेल्या उलट तपासामध्ये देखील अभियोजन पक्षास सहकार्य होईल असे कुठलाही कबुली जबाब आला नाही किंवा असे कुठलेही तथ्य सिध्द झाले नाही.

२१. ज्याअर्थी सा. क्र. १ फिर्यादी व सा. क्र. २ पिडीता यांनी अभियोजन पक्षास सहाय्य होइल अशी साक्ष दिली नसुन स्वतःचे अगोदरच्या जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिल्याने सा. क्र. ३ पारधी व सा. क्र. ४ भोये यांची साक्ष फक्त औपचारीक उरते.

२२. या प्रमाणे आरोपी आकाश याने दिनांक २१/०८/२०२२ रोजी पिडीतेस लग्नाचे आमिष दाखवुन, तिच्या पालकांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेल्याचे किंवा तिच्याशी शारीरीक संबंध केल्याचे काहीएक सिध्द होत नाही.

२३. वरील प्रमाणे, असे आढळून येते की, अभियोग पक्षाच्या वतीने अभिलेखावर आलेल्या पुराव्या आधारे, आरोपी विरुध्द निश्चीत करण्यात आलेल्या दोषारोपातील एकही तथ्य सिध्द होत नसल्याने, त्याचे विरुध्द कुठलाही दोषारोप सिध्द झाल्याचे म्हणता येणार नाही व त्याला शिक्षाही देता येणार नाही. या कारणास्तव, आरोपी विरुध्दचे निश्चीत केलेले दोषारोप सिध्द होत नसल्याने, आरोपी दोषमुक्त होणेस पात्र आहे. म्हणून, इतर **सर्व मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.**

२४. वरील विवेचना वरुन असे स्पष्ट होते की, अभियोगपक्षाने संशयापलीकडे, आरोपी विरुध्द गुन्हे शाबित केलेले नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परीणामी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे -

: **<u>आ दे श</u>** :

१. आरोपी **आकाश ज्ञानदेव मोरे** याची फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २३५ (१) नुसार भारतीय दंड विधान कलम ३६३, ३७६(२)(एन) व बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ चे कलम ४ व ६ प्रमाणेच्या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. मुद्देमाल प्रॉपर्टी हिरो स्प्लेंडर मोटारसायकल रजिष्टेशन क्र. एम.एच. -१२-एस.एन.-९६५२ ही नि. क्र. ८ वरील आदेशाने मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात आली तो आदेश कायम करण्यात येतो.

३. मुद्देमाल ओपो कंपनीचा व सॅमसंग कंपनीचा स्क्रीन टच मोबाईल फोन दोषारोपपत्रातील कॉलम नं.१२ मधील अ.क्र. १ व २ मध्ये नमुद वर्णनाचे अपिल कालावधी संपले नंतर मागणी केल्यास मुळ मालकी बाबतची पडताळणी करुन मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात यावा.

४. दोषारोपपत्रातील कॉलम नं. १२ मधील अ.क्र. ३ ते ६ व ८ ते १० मध्ये नमुद मुद्देमाल मुल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्या नंतर नाश करण्यात यावा.

५. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येऊन, त्यास मुक्त करण्यात येत आहे.

६. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी, आरोपीने, मा. अपीलीय न्यायालयामध्ये हजर होणे कामी, स्वत:चे व जामीनदाराचे रुपये १५,०००/- चे बंधपत्र दाखल करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालय कक्षामध्ये घोषित करण्यात आला.

Y. H. Ameta
Digitally signed by Y. H. Ameta
Date: 2023.11.10 16:11:48 +0530

संगमनेर. (**यो. ही. आमेटा**)

दिनांक : ०१/११/२०२३. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

संगमनेर.